| MHSN060003522024 | R.C.S. 43/2024<br>Shankar Babu Ingole Ingvale Thr Legal Heir Vs. Sarjerao Mukinda Bisure |
|---|---|

## निशाणी ५ व २५ खालील संयुक्त आदेश

यातील निशाणी ५ प्रमाणे दिवाणी प्रक्रिया संहिता नुसार आदेश ३९ नियम १ व २ व कलम १५१ नुसार तुर्तातुर्त मनाईकरीता अर्ज दाखल केलेला असून निशाणी २५ प्रमाणे मंडळ अधिकारी, आरग यांचेकडील प्रस्तावित कार्यवाही तहकूब होऊन मिळणेकरीता अर्ज दाखल केलेला आहे. यातील प्रतिवादी यांनी निशाणी १५ प्रमाणे तुर्तातुर्त मनाई अर्जास आणि निशाणी २६ प्रमाणे निशाणी २५ कडील अर्जास म्हणणे दाखल केलेले आहे.

०२. वादीतर्फे वकील श्री. एस. एस. पाटील आणि प्रतिवादीतर्फे वकील श्री. एन. पी. मेडसिंगे यांचा युक्तीवाद ऐकला. वादीचा दावा, प्रस्तुतचे अर्ज तसेच प्रतिवादी यांची कैफियत व प्रस्तुत अर्जास म्हणणे याचा विचार करता, खालीलप्रमाणे मुद्दे विचारार्थ निर्माण होतात व त्यावरील निष्कर्ष खालील कारणमिमांसासह नोंदवित आहे.

| अ. नं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१ | वादीने सकृतदर्शनी केस असल्याचे शाबीत केले आहे का ? | **होकारार्थी** |
| ०२ | तुर्तातुर्त अर्ज नामंजुर झाल्यास, वादीचे कशानेही न भरुन येणार असे नुकसान होईल, असे वादीने शाबीत केले आहे का ? | **होकारार्थी** |
| ०३ | न्यायाचा समतोल वादीचे बाजुने आहे, असे वादीने शाबीत केले आहे का ? | **होकारार्थी** |
| ०४ | काय आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## <u>कारणमिमांसा</u>

०३. वादीतर्फे वकिलांनी युक्तीवाद केला की, यातील प्रतिवादी यांना त्यांच्या शेतात जाण्यासाठी दोन पर्यायी रस्ते आहेत. परंतु सदर रस्त्यांचा विचार तहसिलदार यांनी महाराष्ट्र महसुल अधिनियम कलम १४३ प्रमाणे आदेश पारीत करतेवेळी विचारात घेतलेला नाही. तसेच कलम १४३ प्रमाणे चौकशी करतेवेळी व शेतकऱ्याला रस्ता मंजूर करताना, त्याच्या शेतातील कामासाठी आवश्यक असलेल्या सोयी–सुविधा आणि गरजेचा विचार करणे आवश्यक आहे. तसेच ज्याठिकाणाहून रस्ता मंजूर करीत आहे तो रस्ता तेथूनच देणे योग्य आहे का याचा देखील विचार करणे आवश्यक आहे. तसेच पुढे युक्तीवाद केला की, सदर कलम १४३ प्रमाणे चौकशीच्या वेळी झालेलया पंचनाम्यामध्ये केवळ वादी यांच्या शेतमिळकतीची पाहणी केल्याचे दिसून येते. परंतु प्रतिवादी यांच्या शेतमिळकतीची पाहणी केल्याचे दिसून येत नाही. तसेच पुढे युक्तीवाद केला की, तहसिलदार यांनी कलम १४३ प्रमाणे चौकशीच्या वेळी वरील कायदेशीर बाबी विचारात घेतल्या नसलयाचे कथन केले आहे. तसेच तहसिलदार यांच्या आदेशामध्ये रस्ता कोठून, कोणत्या गटातून किता फुटाचा मंजूर करणेत आला याबाबत कोठेही नमूद नाही. त्यामुळे यातील प्रतिवादी यांनी त्यांना हवा तेवढा रस्ता केला तर वादी यांचे नुकसान होणार आहे. तसेच पुढे युकतीवाद केला की, सदरच्या प्रस्तावित रस्त्यावर जुनी झाडे व फळझाडे असून काही ठिकाणी केतकीचे बन तयार झालेले आहेत. तसेच सदरच्या प्रस्तावित रस्त्यामधील जमीन ही उंच, सखल अशी असून सरळ व समतोल नाही. तसेच पुढे युक्तीवाद केला की, तहसिलदार यांच्या आदेशान्वये प्रस्तावित रस्ता झालेस वादीचे साधारणपणे तीन हजार फूट लांबीच्या क्षेत्राचे नुकसान होणार आहे. तसेच पुढे युक्तीवाद केला की, मंडळ अधिकारी, आरग यांनी दि. १८.०८.२०२५ रोजी तहसिलदार यांच्या आदेशाच्या अंमलबजावणी करणेबाबत नोटीस दिलेली असून त्याप्रमाणे प्रस्तावित रस्ता झालेस वादी यांचे नुकसान होणार आहे. त्यामुळे त्यांनी युक्तीवाद केला की, यातील वादी यांचे दोन्ही अर्ज मंजूर करणेत यावेत.

०४. याऊलट प्रतिवादीतर्फे वकिलांनी युक्तीवाद केला की, यातील वादी यांचे

वर्तन विचारात घेणे अत्यंत आवश्यक आहे की, कारण वादी यांनी दावा दाखल केल्यानंतर प्रस्तुतचा तुर्तातुर्त मनाई अर्ज चालविणेकामी कोणतेही प्रयत्न केले नसल्याचे अभिलेखावरुन दिसून येते. यावरुन वादी यास तुर्तातुर्त मनाई अर्ज चालविणेचे स्वारस्य नसल्याचे दिसून येते. तसेच पुढे युक्तीवाद केला की, तहसिलदार यांनी कलम १४३ प्रमाणे चौकशी करुन रस्ता मंजूर केलेला आहे. त्यामुळे तहसिलदार यांचा आदेश चुकीचा कसा आहे हे दाखविणे गरजेचे आहे. परंतु वादी याची तशी कोणतीही प्रथमदर्शनी केस दिसून येत नाही. तसेच पुढे युक्तीवाद केला की, यातील वादी यांनी तहसिलदार यांचेसमोरील केसमध्ये दाखल केलेल्या म्हणणे आणि लेखी युक्तीवाद यामध्ये गट नं. २४५ च्या हद्दीमधून दक्षिण बाजूने असणारा गाडी वाट रस्ता याबाबत कोठेही उल्लेख नाही. तसेच पुढे युक्तीवाद केला की, यातील वादी यांनी तहसिल केसच्या कामी करण्यात आलेल्या पंचनामा चुकीचा असलेबाबत कोठेही आक्षेप घेतलेला नाही तसेच तो आव्हानीत केलेला नाही. तसेच पंचनामा पुन्हा करणेकरीता कोणताही अर्ज तहसिल केसमध्ये दाखल केलेला नाही. तसेच पुढे युक्तीवाद केला की, यातील प्रतिवादी यांनी त्यांच्या शेतमिळकतीत जाणे येणेकरीता इतर कोणताही पर्यायी रस्ता नाही. तसेच वादी यांनी त्यांचे दाव्यामध्ये झांडाबाबत कथन केलेले आहे. परंतु सदरचा प्रस्तावित रस्ता करतेवेळी खरोखरच झाडे तोडली जाणार आहेत का, तसेच सदरच्या झाडांची ७/१२ उता–यावर नोंद नसल्याबाबत कोणतेही कथन केलेले नाही. तहसिलदार यांच्या आदेशान्वये करण्यात येणारा प्रस्तावित रस्ता हा बांधावरुन जाणारा असून त्यामध्ये वादी यांच्या कोणत्याही पिकावरुन रस्ता होणार नाही. तसेच सदर प्रस्तावित रस्तयाच्या मध्ये विहिर तसेच झाडे येत नाहीत. तसेच पुढे युक्तीवाद केला की, केतकीचे बन तोडण्याकरीता कोणत्याही परवानगीची आवश्यकता नाही. पुढे युक्तीवाद केला की, वादी यांची कोणतीही प्रथमदर्शनी केस नाही. तसेच तहसिलदार यांनी पारीत केलेला आदेश हा योग्य व बरोबर असून सदरचा प्रस्तावित रस्ता पूर्ण झालेस वादी यांची कोणतेही नुकसान होणार नाही व याऊलट न झालेस प्रतिवादी यांचे नुकसान होणार आहे. तरी अर्ज नामंजूर करणेची त्यांनी विनंती केली आहे.

**<u>मुद्दे क्र.१ ते ३ करीता–</u>**

**०५.** यातील मुद्दे क्र.१ ते ३ हे संलग्न असल्याने ते एकत्रात विचारात घेण्यात

आले आहेत. वादी व प्रतिवादी यांचे परस्पर कथने पाहता दावामिळकतीच्या मालकी बाबत वाद नाही. यातील वादीचे कथन असे आहे की, प्रतिवादी यांनी तहसिलदार, मिरज यांचेकडे महाराष्ट्र जमीन महसूल कायदा कलम १४३ प्रमाणे रस्ता केस/एस.आर.१६/२०२२ चा अर्ज दाखल केला होता. सदर अर्जाचा निकाल हा दिनांक ११.०९.२०२३ रोजी होऊन तहसिलदार यांनी वादींच्या मालकीच्या दावा शेतजमीनी मिळकतीमधून प्रतिवादीस कलम १४३ नुसार रस्ता देण्याचा आदेश दिलेला आहे. यातील वादीचे कथन असे आहे की, तहसिलदार यांनी केलेला रस्ता मंजुरीचा आदेश मुलतः बेकायदेशीर व रद्दबातल असा आहे. त्यामुळे वादीने प्रस्तुतचा दावा हा जाहीर होऊन मिळणेकरीता व मनाईकरीता दाखल केलेला आहे.

**०६.** वादीचे कथन असे आहे की, तहसिल केसमध्ये यातील प्रतिवादी यांनी गट नं. १५६/१, १५७ व १५८ या मिळकतीच्या सर्व हिस्सेदारांना पक्षकार केलेले नव्हते. तसेच वादीचे कथन असे आहे की, वादी क्र. १–अ ते १–ड यांचे पूर्वहक्कदार शंकर बाबू इंगवले हे दि. १३.११.२०२२ रोजी मयत झाले, त्यामुळे प्रतिवादींचा कलम १४३ चा अर्ज निकालापूर्वीच अबेट झालेला आहे. त्यामुळे तहसिलदार यांचा निकाल हा अंमलबजावणीस पात्र नव्हता व नाही असे वादीचे कथन आहे. याउलट प्रतिवादीतर्फे वकिलांनी युक्तीवाद केला की, यातील प्रतिवादी यांनी तहसिल केसच्या कामी सर्व हिस्सेदारांना पक्षकार केलेले होते. सदरचे प्रकरण हे प्रतिवादी यांनी सन २०२० मध्ये दाखल केले होते. त्यावेळच्या मिळकतीच्या ७/१२ उता–यावर असणा–या सर्व हिस्सेदारांना पक्षकार केलेले होते. तसेच पुढे युक्तीवाद केला की, शंकर इंगवले हे मयत झालेबाबत तहसिल कोर्टास कळविण्याची जबाबदारी ही त्यांच्या वारसांची होती. तसेच प्रकरणाची पूर्ण सुनावणी झाल्यानंतर एखादा पक्षकार मयत झालेस दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ नियम ६ प्रमाणे सदरचे प्रकरण अबेट होत नाही. यातील वादी यांनी तहसिल केसच्या कामी सर्व हिस्सेदारांना आवश्यक पक्षकार केले नसल्याचे तसेच शंकर इंगवले हे मयत झालेने केस अबेट झाल्याचे कथन केले आहे. परंतु सदरची बाब ही वादी यांनी तहसिल केसमध्ये तहसिलदार यांचेसमोर उपस्थीत केली नसल्याचे अभिलेखावरुन दिसून येते. त्यामुळे सदरची बाब सद्यपरिस्थीत विचारात घेण्यात आलेली नाही.

०७. वादीचे कथन असे आहे की, प्रतिवादीच्या मालकीचे गट नं. ३०० व ३०१ हे दक्षिणोत्तर चालीचे आहेत. सदर गट नं. ३०० च्या पश्चिमेस गट नं. २४५ ची शेतजमीन असून ती पुर्व–पश्चिम चालीची आहे. सदर गट नं. २४५ च्या पश्चिमेस दक्षिणोत्तर चालीचा खटाव–सलगरे डांबरी रस्ता आहे. तसेच सदर रस्त्यापासून पूर्वेकडे गट नं. २४५ च्या हद्दीमधून दक्षिण बाजूने गाडीवाट अस्तित्वात आहे. सदर गाडीवाट पुढे ओढयापलीकडे जाऊन सरळ गट नं. २४९ मधून उत्तर दिशेने प्रतिवादी यांच्या गट नं. ३०० पर्यंत ब–याच वर्षापासून वहिवाटीत होती व आहे. तसेच वादीचे कथन असे आहे की, त्यावरुनच प्रतिवादी हे अनेक वर्षापासून वहिवाट करीत होते व आहे. तसेच वादीचे कथन असे आहे की, प्रतिवादींच्या मालकीची गट नं. ३०० व ३०१ च्या दक्षिणेस असणा–या गट नं. २९८ च्या अग्नेय कोप–यातून खटाव–बमनाळ रस्ता जातो. त्या रस्त्यापासून सलग गट नं. २९८ च्या पश्चिम बाजूने प्रतिवादीच्या गट नं. ३०० व ३०१ पर्यंत प्रतिवादीस रस्ता उपलब्ध होता व आहे.

०८. यातील वादी याचे कथन असे आहे की, यातील प्रतिवादी यांना त्यांच्या शेतजमीन मिळकतीमध्ये जाणे–येणे करीता पर्यायी रस्ते उपलब्ध असताना सदरची वस्तुस्थिती तहसिलदार यांनी विचारात घेतलेली नाही. त्यामुळे वादीचे कथन असे आहे की, सदरचा तहसिलदार यांचा निकाल हा चुकीचा व रद्दबातल आहे. यातील वादी यांनी तहसिल केसचे कामी दाखल केलेले म्हणणे आणि लेखी युक्तीवाद याचे अवलोकन केले असता यातील वादी यांनी तहसिल केसचे कामी गट नं. २९८ चे पूर्व–दक्षिण म्हणजेच ईशान्य कोप–यातून वहिवाटीचा रस्ता असल्याचे कथन केलेचे दिसून येते. यातील वादी यांनी तहसिल केसच्या कामी वर नमूद केल्याप्रमाणे खटाव–सलगरे डांबरी रस्त्यापासून पूर्वेकडे गट नं. २४५ च्या हद्दीमधून दक्षिण बाजूने गाडी वाट असून सदरची गाडी वाट पुढे ओढयापलीकडे जाऊन सरळ गट नं. २४९ मधून उत्तर दिशेने प्रतिवादी यांच्या गट नं. ३०० पर्यंत वहिवाटीत असल्याबाबत कोठेही नमूद केलेले नाही. त्याचप्रमाणे गट नं. २९८ च्या पश्चिम बाजूने प्रतिवादीच्या गट नं. ३०० व ३०१ पर्यंत प्रतिवादीस रस्ता असल्याची बाब देखील तहसिल केसमध्ये कथन केल्याचे कोठेही दिसून येत नाही.

यातील वादी यांनी तहसिल केसच्याकामी केवळ गट नं. २९८ च्या अग्नेय दिशेकडून रस्ता असलेबाबत कथन केल्याचे दिसून येते.

०९. यातील वादी यांनी मौजे खटाव चा गावनकाशा निशाणी ३/६ खाली दाखल केलेला आहे. सदर गावनकाशाचे अवलोकन केले असता गट नं. २९८ च्या अग्नेय बाजूकडून तुटक रेषेने जाणारा रस्ता असल्याचे दिसून येते. प्रस्तुतकामी वादी व प्रतिवादी यांनी तहसिल केसच्या कामातील कागदपत्रे व तहसिलदार यांच्या आदेशाची प्रत दाखल केलेली आहे. तहसिल केसच्या कामी दिनांक २४.०५.२०२२ च्या कामी वस्तुस्थितीचा पंचनामा झालेला आहे. सदर पंचनामयाचे अवलोकन केले असता सदरचा पंचनामा हा केवळ दावा मिळकतीच्या शेतजमीनीचा केला असल्याचे दिसून येते. सदरच्या पंचनाम्यामध्ये गट नं. १५६ व १५७ मधून गट नं. २३१ च्या बाजूने पाच ते दहा फूट रुंदीचा मातीचा बांध असलेबाबत नमूद केलेले आहे. तसेच सदर बांधावर केतकी व लहान मोठी झाडे असल्याचे नमूद केलेले आहे. तसेच गट नं. १५८ मध्ये गट नं. १५७ च्या हद्दीजवळ गट नं. २३६ व १५८ चे सरहद्दीपासून अंदाजे दहा ते पंधरा फूटावर विहीर असल्याचे नमूद केलेले आहे. तसेच खटाव हद्दीतील गट नं. २३६ हा सरहद्दीस असून त्याची सरहद्दीची लांबी अंदाजे तीन हजार फूट असल्याचे नमूद केलेले आहे. यातील वादी यांनी तहसिल केसच्या कामी दाखल केलेल्या म्हणण्यामध्ये व लेखी युक्तीवादामध्ये गट नं. २९९ चे पूर्व दक्षिणेस म्हणजेच ईशान्य कोप–यातील रस्त्याचा उल्लेख केलेला नसल्याचे कथन केलेले आहे. तहसिलदार यांनी पारीत केलेल्या आदेशाचे अवलोकन केले असता त्यांनी दिनांक २४.०५.२०२२ रोजी झालेल्या वस्तुस्थिती पंचनाम्याच्या आधारावर दावा मिळकतीमधून रस्ता मंजूर करणे गरजेचे व न्यायाचे असल्याचे निष्कर्ष काढला आहे. तसेच सदरच्या आदेशाचे अवलोकन केले असता गावनकाशा प्रस्तावित गटाने पर्यायी रस्ता दिसत नसून सदर मागणी रस्ता हा जानरावવाडी व खटाव या दोन गावांचा शिवरस्ता असल्याचे दिसून येते असा निष्कर्ष काढलेला आहे. वर नमूद केल्याप्रमाणे मौजे खटावचे गावनकाशामध्ये गट नं. २९८ च्या अग्नेय बाजूने तुटक रेषेने रस्ता दर्शविलेला आहे. सदरची बाब तहसिलदार यांनी आदेशामध्ये विचारात घेतली नसल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. त्याचप्रमाणे

वस्तुस्थितीच्या पंचनाम्यामध्ये देखील दावा मिळकती व्यतिरिक्त प्रतिवादी यांच्या मिळकतीबाबत तसेच इतर वस्तुस्थितीबाबत पंचनामा केला नसल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. यातील वादीतर्फे आधार घेण्यात आलेल्या मा. मुंबई उच्च न्यायालय यांचे संभाजी विठ्ठल गवळी विरुध्द जिल्हाधिकारी, अहमदनगर, रिट पिटीशन नं. १०२५१/२०२३ या केसमध्ये दिनांक ०१.०७.२०२४ रोजी झालेल्या आदेशान्वये मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी तहसिलदार यांनी ज्या शेतजमीनीच्या मिळकतीसाठी रस्ता मंजूर करावयाचा आहे त्या शेतजमीनीचा पंचनामा केला नसल्याने तहसिलदार यांच्या आदेशास स्थगिती दिली आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये देखील वस्तुस्थीती पंचनाम्यामध्ये शेतजमीन व्यतिरिक्त प्रतिवादी यांच्या मिळकतीचा पंचनामा केला नसल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. तसेच प्रतिवादी यांनी मिळकतीच्या लागून असणा–या गट नं. २९८ च्या अग्नेय कोप–यातून असणा–या रस्त्याचा विचार केला नसल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. यावरुन वादी याची प्रथमदर्शनी केस दिसून येते.

**१०.** यातील वादी याचे कथन असे आहे की, गट नं. २३६ मध्ये जुनी विहीर असून ती सदर गटाच्या उत्तरेकडील हद्दीस लागून आहे. तसेच सदरच्या विहीरीवर विद्युत मोटार असून त्याचा खांब व विजेची पेटी ही उत्तरेकडील हद्दीवरच आहे. तसेच प्रस्तावित रस्त्यावर नारळ, चिंच, लिंब, आंबा, चिकू, सिताफळ अशी फळाची झाडे असून काही ठिकाणी केतकीचे बन तयार झालेले आहे. तसेच त्यामध्ये द्राक्षबागाचे साधारणपणे ५० ताण रोवलेले असून ओढापात्रालगत जुनी विहीर आहे. तसेच गट नं. २३५ च्या विहिरीतून गट नं. २३६ च्या उत्तरेच्या हद्दीवरुन विहीरीपासून पाईपलाईन केली असल्याचे कथन केलेले आहे. सदरची बाब ही प्रतिवादी यांनी नाकारलेली आहे. यातील वादी यांनी अभिलेखावर काही फोटोग्राफस दाखल केलेले असून सदरच्या फोटोग्राफसचे अवलोकन केले असता विहिरीबाबत तसेच झाडांबाबत प्रथमदर्शनी वस्तुस्थिती दिसून येते. यातील प्रतिवादी यांनी सदरची झाडे ही प्रस्तावित रस्त्यामध्ये नसल्याचे युक्तीवादादरम्यान कथन केले. तसेच वादी यांनी दाव्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे दाव्यासंदर्भात कोणतीही प्रथमदर्शनी वस्तुस्थिती अभिलेखावर आणली नसल्याचे कथन केले आहे. परंतु वस्तुस्थिती पंचनाम्याचे अवलोकन केले असता गट नं. १५६ व १५७

मधून गट नं. २३६ च्या बाजूने सरासरी ५ ते १० फूट रुंदीचा मातीचा बांध असल्याचे व सदर बांधावर केतकी व लहान मोठी झाडे असल्याचे नमूद केलेले आहे. तसेच गट नं. १५८ मध्ये गट नं. १५७ च्या हद्दीजवळ गट नं. २३६ व १५८ च्या सरहद्दीपासून अंदाजे दहा ते पंधरा फूटावर विहीर असल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे वादी यांच्या कथनास प्रथमदर्शनी पुष्टी मिळते. तसेच वादी यांच्या कथनाप्रमाणे प्रस्तावित रस्त्यामध्ये वादी यांच्या दावा मिळकतीमधील साधारणपणे तीन हजार फूट लांबीच्या क्षेत्राचे नुकसान होणार असल्याचे कथन केलेले आहे. तहसिलदार यांनी केलेल्या आदेशावरुन मौजे खटाव येथील गट नं. २३६ च्या उत्तर बाजूकडून व जानराववाडी येथील गट नं. १५८, १५७ व १५६ च्या दक्षिण बाजूने सरबांधावरुन रस्ता मंजूर केल्याचे दिसून येते. वर नमूद केल्याप्रमाणे प्रस्तुत केसचे कामी तहसिलदार यांनी आदेश पारीत करतेवेळी गट नं. २९८ च्या अग्नेयेस असणा–या रस्त्याचा विचार केला नसल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. तसेच प्रस्तावित रस्ता हा सरबांधावरुन दिल्याचे दिसून येते. तसेच वर नमूद केल्याप्रमाणे दावामिळकतीच्या बांधावर झाडे असल्याची बाब दिसून येते. तसेच प्रस्तावित रस्त्यामुळे वादी यांचे साधारण तीन हजार फूट इतके क्षेत्र बाधीत होणार असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. तहसिलदार यांनी पारीत केलेल्या आदेशाच्या बजावणीकरीता मंडळ अधिकारी यांनी वादी यांना नोटीसा काढल्याचे दिसून येते. तसेच सदरच्या नोटीसीप्रमाणे दिनांक १८.०८.२०२५ रोजी प्रस्तावित रस्ता करणार असल्याचे दिसून येते. वर नमूद केलेप्रमाणे वादी याची प्रथमदर्शनी केस दिसून येत आहे. त्यामुळे तहसिलदार यांच्या आदेशान्वये प्रस्तावित रस्ता झालेस वादी यांचे नुकसान होणार आहे. तसेच सद्यपरिस्थीतीत न्यायाचा समतोल हा वादी यांच्या बाजूने आहे. तसेच वादी यांच्या कथनानुसार प्रतिवादी यांनी इतर पर्यायी रस्ते आहेत हा पुराव्याचा भाग असून त्या अनुषंगाने पुरावा येणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे तहसिलदार यांनी आपल्या आदेशामध्ये प्रस्तावित मागणी रस्ता हा जानराववाडी व खटाव या दोन गावांचा शिवरस्ता असल्याचे निष्कर्ष काढलेला आहे. त्याअनुषंगाने देखील पुरावा येणे आवश्यक आहे. एकंदरीत वरील विवेचनावरुन वादी यांची प्रथमदर्शनी केस दिसून येते आहे. त्याचप्रमाणे प्रस्तावित रस्ता झालेस वादी यांचे नुकसान होणार आहे. त्यामुळे मी मुद्दा क्रमांक १ ते ३ करीता होकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे. सबब, मी मुद्दा क्र.४ करीता

खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

| | |
|---|---|
| १. | वादी यांचा निशाणी ५ व निशाणी २५ खालील अर्ज मंजूर करणेत येतात. |
| २. | यातील प्रतिवादी क्रमांक १ ते ७ यांनी स्वतः अगर तर्फे इसमांच्या मार्फत दाव्याच्या अंतिम निर्णयापर्यंत तहसिलदार तथा शेतजमीन न्यायाधिकरण, मिरज यांचेकडील रस्ता केस/१४३/एस.आर./१६/२०२२ मधील दिनांक ११.०९.२०२२ रोजी झालेल्या निकालाची अंमलबजावणी करु नये अशी तुर्तातुर्त ताकीद देणेत येते. |
| ३. | त्याचप्रमाणे प्रतिवादी नं. १ ते ७ यांनी स्वतः अगर तर्फे इसमांच्या मार्फत वादींच्या खटाव येथील गट नं. २३६, जानराववाडी येथील गट नं. १५६, १५७, १५८ च्या सरबांधावरुन सदर दाव्याच्या अंतीम निकालापर्यंत रस्ता निर्माण करु नये आणि दावा मिळकतीमधील वादींच्या कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा कोणत्याही प्रकारे करु नये अशी तुर्तातुर्त ताकीद देणेत येते. |
| ४. | त्याचप्रमाणे मंडळ अधिकारी, आरग यांचेकडील क्र.र.नं. ५०६/२०२५ प्रमाणे तहसिलदार, मिरज यांचेकडील रस्ता केस/१४३/एस.आर./१६/२०२२ मधील दिनांक ११.०९.२०२२ रोजीच्या आदेशाची अंमलबजावणी व त्याप्रमाणे प्रस्तावित कार्यवाही दाव्याच्या अंतीम निर्णयापर्यंत तहकूब ठेवणेत यावी. |
| ५. | सदरच्या आदेशाची तहसिलदार, मिरज तसेच मंडळ अधिकारी, आरग यांना प्रत पाठविण्यात यावी. |
| ६. | सदरच्या अर्जाचा खर्च मूळ दाव्यासोबत चालविण्यात यावा. |

ANIRUDHA SUNIL RANE
Digitally signed by ANIRUDHA SUNIL RANE
Date: 2025.08.18 11:47:14 +0530

मिरज
दि.१४.०८.२०२५

**(ए. एस. राणे)**
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, मिरज.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file Order are same, word to word, as per the original Order.

Name of the Stenographer : Shri. S. S. Shingana, Grade-3

Court : C.J.J.D. & J.M.F.C., Miraj.

Date of Decision : 14.08.2025

Judgment/Order signed by
the Presiding Officer on : 14.08.2025

Judgment/Order uploaded on : 18.08.2025